**सरकारतर्फे सा.क्र. १**

**शपथेवर**

**माझे नांव :** दिपक कैलास सिंग,
**वय :** ३५ वर्षे, धंदा : नोकरी,
**सध्या राहणार :** बाभळेश्वर, ता. राहता, जि.अहमदनगर

**<u>सरतपास सरकार पक्षातर्फे विद्वान सरकारी वकिल श्रीमती एस. पी. औताडे यांचेमार्फत शपथेवर सुरू</u> —**

१. दि.२२/०५/२०२४ रोजी मी बाभळेश्वर येथे सहाय्यक अभियंता या पदावर महापारेशन विभागात नोकरीस होतो. मी तेथे मागील १२ वर्षापासुन कार्यरत आहे. वाहिनी प्रकल्पाच्या नविन मनोरा उभारणीचे सर्व काम आम्ही करत होतो. घटना दुपारी १२.३० वा. सुमारास मौजे सौंदाळा येथील गट क्र. १०६/२ येथे घडली होती. सदर दिवशी मनोरा क्र. १३५ च्या पायाभरणीच्य कामासाठी मी, किशोर कातोरे, ओमप्रकाश राजगुरू, रोहित नागपुरे, सागर पिंगटे, दिपक निसाद आणि संतोष लांडे असे सर्व जण पोलीस बंदोबंस्तासह घटनास्थळी गेलो होतो.सदर दिवशी २२० के.बी. विशविंड ते भेंडा या वाहिनीचे मनोरा क्र. १३५ च्या पायाभरणीच्या कामासाठी गेलो होतो. त्यावेळी आम्ही संजय ठुबे यांना फोन करून तेथे बोलावले असता ते तेथे आले नाहीत. त्यांनी त्यांचे दोन पुतणे आदित्य ठुबे, महेश ठुबे आणि त्यांचा भाउ बाळासाहेब ठुबे व इतर अशोक आरगडे व संभाजी बारे यांना पाठवले होते.त्यावेळी आम्ही त्यांना सांगितले की, मनोराच्या पायाभरणीचे काम करायचे असुन तेथील आंब्याच्या झाडांचा आणि पिकांचा पंचनामा करायचा आहे. त्यावेळी त्यांनी आम्हाला सांगितले की, आम्ही तुम्हाला काम करून देणार नाहीत येथुन निघुन जा. त्यांनी आमच्यावर दबाव टाकण्यासाठी संजय ठुबे यांच्या पुतण्यांनी त्यांच्या मोबाईल मध्ये शुटिंग केले. त्यावेळी त्यांनी आम्हाला तेथे काम करू दिले नाही. आमचे कर्मचारी रोहित नागपुरे यांनी त्यांच्या मोबाईल मध्ये सर्व शुटिंग केले व त्यानंतर आम्ही तेथुन निघुन गेलो.

२. त्यानंतर किशोर त्रिबंक कोतोरे यांनी कार्यकारी अभियंता यांची

परवानगी घेउन नेवासा पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवली. मी आरोपींना पाहिल्यास ओळखु शकतो. अशोक अरगडे वगळता इतर सर्व आरोपी न्यायालयात उपस्थित आहे. **(नि. ३६ वर आरोपी क्र. ५ चा गैरहजेरी माफीचा अर्ज दाखल. सदर अर्ज आरोपीची ओळख आव्हानित न करण्याच्या अटीवर मंजुर करण्यात आला.)**

**सरतपास पुर्ण.**

**आरोपींतर्फे विद्वान वकील श्री. एस.एस.गिरी यांचे मार्फत उलटतपास सुरू.**

३. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी आणि पंच साक्षीदार यांना मी ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी, पंच साक्षीदार व इतर सर्व साक्षीदारांनी संगनमत करून आरोपींविरूद्ध फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे आहे की, दि.२२/०५/२०२४ रोजी आम्ही आरोपीच्या शेतात कामाकरीता जाणार आहोत याची पुर्व कल्पना आरोपींना नोटीसद्वारे दिली नव्हती.हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना कोणतीही पुर्व परवानगी न देता त्यांच्या शेतात जाण्याचा आमचा उद्देश होता. हे म्हणणे खरे नाही की, दि. २५/०५/२०२४ रोजी आरोपींनी मला माझे ओळखपत्र मागितले होते व मी त्यांना ते दाखविले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ संजय रामहरी ठुबे यांना मी पूर्वीपासुन ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, दि. २६/११/२०२० रोजी मा. उपविभागिय अधिकारी यांनी निर्णय पारीत केला होता व जोपर्यंत आरोपी मनोरा उभारण्यासाठी मोबदला देत नाहीत तोपर्यंत आम्ही काम करीत नाहीत असे आरोपींना कळविले होते. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. १०६/२ चे मुळ मालक हे बंडु रामहरी ठुबे हे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मुळ मालक बंडु रामहरी ठुबे यांनी आम्हाला काम करण्यास कधीही विरोध केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, बंडु रामहरी ठुंबे व त्यांच्या कुटुंबातील इतर सदस्यांचा आम्हाला काम करण्यास कधीही विरोध नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत प्रकरणात मी कोणाच्या तरी सांगण्यावरून साक्ष देत आहे. साक्षीदार सांगतो की, घटनेच्या वेळी मी स्वत:

तेथे हजर होतो. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळी आरोपींपैकी कोणीही व्हीडीओ काढत नव्हते उलटपक्षी आरोपींना घाबरवण्यासाठी रोहित ठुबे हेच व्हीडीओ काढत होते. हे म्हणणे खरे आहे की, मनोरा उभारण्यापुर्वी जागेचा पंचनामा करणे आवश्यक आहे. हे म्हणणे खरे नाही की, मनोरा उभारण्यापुर्वी आम्ही जागेचा कोणताही पंचनामा न करता प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृती**

स्वाक्षरीत/—
**(लीना अ. काळे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.४,नेवासा

दिनांक :१२/०२/२०२६